# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## Maharashtra Industrial Development Corporation

**(A Government of Maharashtra Undertaking)**

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००

Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.

Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuff Parade, Mumbai-400 005.

☎:०२२-४७४८४३१२/४७४८४६७९/९९

☎ : +९१-२२-४०१६१४५१/५४

www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/P108357 दिनांक: 22/11/23

# परिपत्रक

विषय: भूखंडाचे वाटप केलेल्या किंवा हस्तांतरीत केलेल्या उद्योजकाने विशाल, अति-विशाल प्रकल्प दर्जा प्राप्त केल्यास भूखंडाचा विकास कालावधी वाढविणेबाबत..

संदर्भ: परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/ए४१०६२, दि ०५.०२.२०१४

महामंडळाचे संदर्भाधीन परिपत्रक हे विशाल, अति-विशाल प्रकल्पांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडासाठी लागू आहे. तथापि, महामंडळाच्या विहित कार्यप्रणालीनुसार वाटप केलेल्या तसेच हस्तांतरीत केलेल्या भूखंडधारकाने शासनाकडून विशाल प्रकल्प, अति-विशाल प्रकल्प (Mega Project/Ultra Mega Project) दर्जा प्राप्त केल्यास अशा उद्योजकांना विकास कालावधी देण्याची तरतूद नसल्याने अशा प्रकरणी कार्यवाही करता येत नाही.

त्याअनुषंगाने भूखंडाचे वाटप केलेल्या किंवा हस्तांतरीत केलेल्या उद्योजकाने विशाल, अति-विशाल प्रकल्प दर्जा प्राप्त केल्यास भूखंडाचा विकास कालावधी वाढविणेबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या मा. सदस्य मंडळाच्या दिनांक १७.१०.२०२३ रोजी झालेल्या ३९७ व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ६६५९ पारीत करण्यात आला असुन महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये विहित कार्यप्रणालीनुसार वाटप करण्यात आलेल्या अथवा हस्तांतरीत करण्यात आलेल्या भूखंडधारकाने/उद्योजकाने शासनाकडून विशाल, अति-विशाल दर्जा प्राप्त केल्यास अशा भूखंडधारकांना/उद्योजकांना भूखंड विकासाकरीता पुढीलप्रमाणे विनाशुल्क विकास कालावधी देण्यात येत आहे :

अ) औद्योगिक क्षेत्रामध्ये महामंडळाच्या विहित कार्यप्रणालीनुसार वाटप करण्यात आलेल्या किंवा हस्तांतरीत केलेल्या उद्योजकाने भूखंड वाटप/हस्तांतरण केल्यानंतर शासनाकडून विशाल, अति-विशाल प्रकल्पाचा दर्जा प्राप्त केलेला असल्यास अशा उद्योगांना दोन वर्षाचा वाढीव विकास कालावधी विनाशुल्क देण्यात यावा.



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

आ) उपरोक्त (अ) प्रमाणे वाटप केलेल्या तसेच हस्तांतरीत केलेल्या उद्योजकाने शासनाकडून विशाल, अति-विशाल प्रकल्प दर्जा प्राप्त केला आहे व ज्यांनी अद्याप इमारत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला नाही, अशा सर्व प्रलंबित प्रकरणांना तसेच यापुढे प्राप्त होणा-या प्रकरणांना सदरचे धोरण लागू राहिल.

इ) उपरोक्त (अ) प्रमाणे वाटप केलेल्या तसेच हस्तांतरीत केलेल्या उद्योजकाने विशाल-अति-विशाल प्रकल्प दर्जा प्राप्त केल्यानंतर त्या भूखंडाचा विकास करण्याबाबतच्या धोरणामध्ये वरील बदलाव्यतिरिक्त कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

ई) ज्या उद्योगांना त्यांच्या आवाक्याबाहेरील परिस्थितीत अपरिहार्य कारणास्तव विकास कालावधी विनाशुल्क वाढवून दिलेला असल्यास सदर कालावधी वाढीव विकास कालावधीची परिगणना करताना विचारात घेण्यात येऊ नये.

उ) ज्या उद्योजकांनी भूखंडाच्या विहित विकास कालावधीमध्ये शासनाकडे विशाल, अति-विशाल प्रकल्प दर्जा मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केला आणि अनुज्ञेय विकास कालावधी संपुष्टात आल्यानंतर शासनाकडून विशाल, अति-विशाल प्रकल्प दर्जा प्राप्त केला असल्यास अशा अपवादात्मक प्रकरणात उक्त (अ) प्रमाणे वाढीव विकास कालावधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने मंजूर करण्यात यावा.

ऊ) उपरोक्त (अ) प्रमाणेच्या कालावधीनंतर भूखंड विकासाकरीता केलेली परिणामकारक कार्यवाही विचारात घेऊन मुदतवाढीबाबत प्रचलित धोरणाप्रमाणे कार्यवाही करावी.

ए) उपरोक्त प्रमाणे मुदतवाढ मंजूर करणेचे अधिकार परिपत्रक दि. २०.०६.२०२३ प्रमाणे भूखंड वाटपाचे अधिकार प्रदान केल्याप्रमाणे सक्षम अधिका-यांना राहतील.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

२२.११.२३

(अनिल भंडारी, भा.प्र.से.)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी /विधी/ भूसंपादन/मा व तं/ जनसंपर्क/म.ब.वि./डीएमआयसी/ पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in